प्रशासकीय मान्यता

सन २०१९-२०या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक यांच्याकडून प्राप्त अनुदानातून यंत्र खरेदीस प्रशासकीय मान्यता.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : जीसीजी-२०१९/प्र.क्र.२२५/प्रशा-१
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक : १३ सप्टेंबर २०१९

वाचा :
१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७.
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक ०७.०३.२०१८.
४) जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन कार्यालया, गोंदिया यांचे पत्र क्रमांक जिनिस / का-१ / जिवायो / १९-२०/ प्रस्ताव /६३४/२०१९ दिनांक १५.०५.२०१९
५) संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र : संवैशिवसं/शावैमगो/ जिवायो/यंसाख/१२२८०/१-म/२०१९, दिनांक : २७.०८.२०१९

शासन निर्णय :-

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय , गोंदिया या संस्थेस उपरोक्त दिनांक १५.०५.२०१९ च्या पत्रान्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या निधीतून खालील तक्तयात नमूद केलेली रुपये २,७२,१८,५९९ (रुपये दोन कोटी, बहात्तर लक्ष, अठरा हजार , पाचशे नव्याण्णव फक्त) इतक्या रकमेची यंत्रसामुग्री खरेदी करण्यास या शासननिर्णयान्वये पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र	यंत्राचे नांव	नग	प्रती नग किंमत	एकूण किंमत
१	फिजिओपॅक मशीन	१	१९,५०,०००	१९,५०,०००

अ.क्र	यंत्राचे नांव	नग	प्रती नग किंमत	एकूण किंमत
२	अल्ट्रासाऊंड सिस्टीम	२	१६,००,०००	३२,००,०००
३	व्हेन्टीलेटर	७	१०,३६,०००	७२५२०००
४	फाऊलर बेड	२९	१,७५,०००	५०,७५,०००
५	२ डि ईको मशीन	१	२०,००,०००	२०,००,०००
६	डिफिब्रिलेटर बायफेजीक	३	२,९९,६००	८,९८,८००
७	ऑटोहमेटेड एक्स्टर्नल डिफिब्रिलेटर	५	१,८४,८००	९,२४,०००
८	इन्फयुजन पंप	१२	३१,९२०	३,८३,०४०
९	ग्रॉसिंग स्टेशन विथ स्टॅण्डर्ड ॲक्सेसरीज	१	११,००,०००	११,००,०००
१०	मॅन्युअल रोटरी मायक्रोटोम	१	११,००,०००	११,००,०००
११	ब्लड बँक रेफ्रिजरेटर (६०० लीटर)	१	३,८२,०८४	३,८२,०८४
१२	वॉक ईन कोल्ड रुम	२	९,९१,२००	१९,८२,४००
१३	स्मोक इवॅक्युएशन सिस्टीम	१	९,७१,२७५	९,७१,२७५
	एकूण			**२,७२,१८,५९९**

अटी :-

१. सदर प्रशासकीय मान्यता संबधित संस्थेस जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत मंजूर अनुदानातून प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर यंत्रसामुग्री हाताळणीसाठी नव्याने पदनिर्मितीची, बांधकामाची व विद्युतीकरणाची आवश्यकता नाही, याबाबत संचालनालयाने व संबंधित अधिष्ठाता यांनी खातरजमा करावी.

३. सदर विषयी "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका" याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मध्ये नमूद केलेल्या विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

४. सदर यंत्रसामुग्री खरेदी विषयक प्रक्रिया "औषधे, तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे या बाबींची खरेदी हाफकिन बायो-फामास्युटीकल्स कॉपोरेशन लि. मार्फत करण्याबाबत" निर्गमित शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७ नुसार करावी.

५. सदर यंत्रसामुग्रीची आवश्यकता असल्याचे व त्याची किंमत बाजारभावापेक्षा जास्त नसल्याची खात्री संचालक (वै.शि.) तसेच संबंधित अधिष्ठाता यांनी करावी.

६. सदर यंत्रसामुग्रीची विनिर्दिष्टे व्यापक, सर्वसमावेशक असून त्यानुसार यंत्रपुरवठा करु शकणारे किमान तीन उत्पादक/पुरवठादार यांचेकडून तीन निविदा प्राप्त होऊ शकतील अशा प्रकारची आहेत, असे संचालक (वै.शि.) यांनी प्रमाणित करावे.

७. प्रस्तावित यंत्रसामुग्रीचा समावेश इतरत्र कोणत्याही प्रस्तावात अंतर्भुत केलेला नसल्याबाबत व सदर यंत्रसामुग्री संबंधित संस्थेस आवश्यक असल्याबाबत संचालकांनी खात्री करावी.
८. मुख्य यंत्र व त्यांचे सुटे भाग (Accessories) यांच्या किंमती भिन्न दर्शविणे आवश्यक राहील.
९. सदर विषयी यंत्रसामुग्री खरेदीबाबत निर्णय घेताना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली मंजुर अनुदानाच्या तरतूदीपेक्षा जास्त खर्च केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.
१०.उपरोक्त शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभाग, दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ३.१.२ "किंमतीचा अंदाज व किंमतीचा वाजवीपणा" या शीर्षकाखालील परिच्छेद क्रमांक ३.१.२.१ मधील तरतूदीचे खरेदी समितीने अनुपालन करावे. सदर तरतूदीचे अनुपालन केलेल्या यंत्राच्या किंमतीस आवश्यकतेनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

२. या प्रयोजनासाठी येणारा खर्च संस्थेस खालील लेखाशिर्षाखालील मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

गोंदिया शहर - जिल्हा वार्षिक योजना

मागणी क्रमांक ओ-७२

२२१०	-	वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६	-	सार्वजनिक आरोग्य
८००	-	इतर खर्च
(६०)	-	जिल्हा योजना - गोंदिया
(६०) (०३)	-	ग्रामीण रुग्णालयाकरिता औषधे, साधनसामुग्रीची खरेदी (२२१० ९६९१)
३१	-	सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग -२, अनुक्रमांक-३, नियम क्रमांक-७ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९११२१०७१३६९१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARUN MURLIDHAR RAO DAHALE

Digitally signed by ARUN MURLIDHARRAO DAHALE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, serialNumber=30df743755280cf26ce97ec0978235f63f80f0bc4317129bf381eb48778f2e3d, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARUN MURLIDHARRAO DAHALE
Date: 2019.09.13 15:56:36 +05'30'

(अ. मु. डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखाकार - २ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर.
२. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉपोरेशन लि., मुंबई.
३. जिल्हाधिकारी , जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
५. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया
६. जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया.
७. निवडनस्ती (प्रशा-१).